Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३८ ] सोमवार, नोव्हेंबर ७, २०२२/कार्तिक १६, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२५.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अका-जिपपंस-कावि-३५४-२०२२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जिपनि-२०२१-प्र.क्र.२१८-पं-रा.-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ चे अधिसूचने अन्वये अमरावती जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्या करीता त्यांना सद्यस्थितीत लागू असलेल्या सभापती पदाच्या आरक्षणाच्या मुदतीच्या समाप्ती नंतर लगेच येणा-या दिवसापासून सुरू होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग या मधील (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि (अशा जाती, जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या अमरावती जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या (संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रातील धारणी व चिखलदरा या पंचायत समित्या वगळून) सभापतीच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ फ च्या उप कलम २ (अ), २ (ब), ३ (ब), ४ (अ), ४ (ब) व ५ (अ), ५ (ब) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, पवनीत कौर, जिल्हाधिकारी, अमरावती या आदेशाद्वारे जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांकरीता त्यांना सद्यस्थितीत लागू असलेल्या सभापती पदांच्या आरक्षणाच्या मुदतीच्या समाप्ती नंतर लगेच येणा-या दिवसापासून सुरू होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि (अशा जाती, जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या अमरावती जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या (संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रातील

धारणी व चिखलदरा या पंचायत समित्या वगळून) खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती निहाय सभापती पदाचे आरक्षण करीत आहे.—

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | सभापतीचे पद ज्या प्रवर्गासाठी आरक्षित केले तो प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अंजनगांव सुर्जी | अनुसूचित जाती |
| २ | नांदगांव खंडेश्वर | अनुसूचित जाती |
| ३ | अमरावती | अनुसूचित जाती (महिला) |
| ४ | वरूड | अनुसूचित जमाती |
| ५ | चांदूर बाजार | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ६ | तिवसा | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ७ | चांदूर रेल्वे | सर्वसाधारण |
| ८ | दर्यापूर | सर्वसाधारण |
| ९ | अचलपूर | सर्वसाधारण |
| १० | भातकुली | सर्वसाधारण (महिला) |
| ११ | मोर्शी | सर्वसाधारण (महिला) |
| १२ | धामणगांव रेल्वे | सर्वसाधारण (महिला) |

---

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२६.

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अका-जिपपंस-कावि-३५५-२०२२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जिपंनि-२०२१-प्र.क्र.२१८-पं-रा.-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ चे अधिसूचने अन्वये अमरावती जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील धारणी व चिखलदरा या २ पंचायत समित्या करीता त्यांना सद्यस्थितीत लागू असलेल्या सभापती पदाच्या आरक्षणाच्या मुदतीच्या समाप्तीनंतर लगेच येणा-या दिवसापासून सुरू होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जमाती (अशा अनुसूचित जमातीमध्ये महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या पूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणा-या अमरावती जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ फ च्या उप कलम २ (अ), २ (ब), ३ (ब), ४ (अ), ४ (ब) व ५ (अ), ५ (ब) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, पवनीत कौर, जिल्हाधिकारी, अमरावती या आदेशाद्वारे अमरावती जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील धारणी व चिखलदरा या २ पंचायत समित्यांकरीता त्यांना सद्यस्थितीत लागू असलेल्या सभापती पदाच्या आरक्षणाच्या मुदतीच्या समाप्तीनंतर लगेच येणा-या दिवसापासून सुरू

होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जमाती (अशा अनुसूचित जमाती मध्ये महिलांसह) अमरावती जिल्ह्यातील संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रातील धारणी व चिखलदरा पंचायत समिती मधील सभापती पदाचे आरक्षण खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे करीत आहे.—

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | अनुसूचित जमाती मधील सभापतीचे पद कोणासाठी आरक्षित केले |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | धारणी | अनुसूचित जमाती |
| २ | चिखलदरा | अनुसूचित जमाती (महिला) |

अमरावती :
दिनांक ३ नोव्हेंबर २०२२.

**पवनीत कौर,**
जिल्हाधिकारी,
अमरावती.

---

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२७.

**अध्यक्ष, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये बार्शिटाकळी शहराच्या प्रारुप विकास योजना बार्शिटाकळी (मुळ हद्द सुधारित व वाढीव हद्द) चे प्रसिद्धीकरण**

**सूचना**

क्र. नपंबा.टा-मुअ-६५६-२०२२.—

ज्याअर्थी, बार्शिटाकळी नगर पंचायतने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली), चे कलम २१(१), २३(१) चे अनुषंगाने कलम ३८ मधिल तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना, बार्शिटाकळी (मुळ हद्द सुधारित व वाढीव हद्द) (यापुढे " उक्त प्रारुप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. २, दिनांक १० जून २०२१ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभाग, पुरवणी भाग-१-अ मध्ये दिनांक फेब्रुवारी १७-२३, २०२२ रोजी प्रसिद्ध झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून बार्शिटाकळी नगर पंचायतने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहाय्यक संचालक नगर रचना, अकोला शाखा यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. ५२२, दिनांक ८ एप्रिल २०२२ अन्वये नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, अकोला शाखा यांनी, उक्त अधिनियमातील कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी सभेचा ठराव क्र. २, दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी पारित केलेला आहे;

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खालील नमूद कार्यालयात उपलब्ध आहेत.

(१) मुख्याधिकारी, बार्शिटाकळी नगर पंचायत, बार्शिटाकळी.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, अकोला शाखा, अकोला.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत मुख्याधिकारी, बार्शिटाकळी नगर पंचायत, बार्शिटाकळी यांच्याकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत नगर पंचायतकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन बार्शिटाकळी, नगर पंचायत बार्शिटाकळी कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

(अवाच्य),
अध्यक्ष,
बार्शिटाकळी नगर पंचायत,
बार्शिटाकळी.

बार्शिटाकळी :
दिनांक ४ नोव्हेंबर २०२२.

---

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२८.

BY PRESIDENT, NAGAR PANCHAYAT

**Publication of Draft Development Plan of Barshitakali (Old Limit Revised & Additional Limit Area) Under Section 26(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act. 1966.**

*NOTICE*

No. NPBT-CO-656-2022.—

Whereas, the Barshitakali Nagar Panchayat (hereinafter referred to as " the said Planning Authority, ") *vide* Resolution No. 2, dated 10th June 2021, had declared its intention to prepare a Draft Development Plan of Barshitakali (Old Limit Revised & Additional Limit Area) (hereinafter referred to as the " said Draft Development Plan ") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said " area ") as per the provision of Section 21(*1*), 23 (*1*) read with Section 38 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the " said Act ") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division, Supplement Part-1A on 17 to 23rd February 2022 ;

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, Barshitakali Nagar Panchayat *vide* it's Order No. 522, dated 8th April 2022 has appointed Assistant Director, Town Planning, Akola Branch as " Town Planning Officer " to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Akola, Branch after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, and has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the Planning Authority for publication under section 26(*1*) of the said Act ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 2, dated 4th November 2022 to publish the said Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from the public ;

And whereas, the said Planning Authority hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

(1) The Chief Officer, Barshitakali Nagar Panchayat, Barshitakali.

(2) Assistant Director, Town Planning Akola Branch, Akola.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Barshitakali Nagar Panchayat Barshitakali, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Govt. Gazette.* Suggestions/objections received by the Barshitakali Nagar Panchayat, Barshitakali within the period of the 30 days from the date of publication of this Notice is *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Barshitakali, Nagar Panchayat Barshitakali.

(Illegible),
President,
Barshitakali Nagar Panchayat,
Barshitakali.

Barshitakali :
Dated the 4th November 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.